# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

४१२ ई शिवाजीनगर, पुणे ४११ ०१६.

दूरध्वनी – ०२०-२५६५६२३४/२५६५७१७६

E-Mail: ropune@dtemaharashtra.gov.in Internet: http://www.ropune.org.in

जा.क्र.तंशिविकापु/विवि/२०१९-२०/ 3792 दिनांक :- 17 SEP 2019

तातडीचे/महत्वाचे

प्रति,

संचालक/प्राचार्य,
या विभागीय कार्यालयाच्या अधिनस्त असलेल्या,
पदवी अभ्यासक्रमाच्या सर्व शासकीय/शासन अनुदानित/
विद्यापीठ विभाग/विद्यापीठ संचलित/स्वायत्त संस्था/खाजगी विनाअनुदानित संस्था,
(पुणे विभाग ).

विषय : शैक्षणिक वर्ष २०१९-२० मधील राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षातील तंत्रशिक्षण विभागातंर्गत असलेल्या पदवी अभ्यासक्रमांच्या संस्थास्तरावरील प्रवेश प्रकियेबाबत..

संदर्भ : १.मा. आयुक्त,राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष,मुंबई यांचे पत्र क्रमांक तंशिप्र/१२१९/प्र.क्र.२४७ सीईटी/२०१९/२४२६ दिनांक ४/९/२०१९
२. मा.संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र एडीएम/२०१९/ ७१३ दिनांक ०७/०९/२०१९

उपरोक्त विषयास अनुसरुन या विभागीय कार्यालयाच्या अधिनस्त सर्व शासकीय,शासन अनुदानीत विनाअनुदानीत खाजगी संस्थाना दिनांक १३ व १४ ऑगस्ट २०१९ रोजी संस्थास्तरावरील (स्पॉट राऊंड) प्रवेश प्रक्रिया आयोजित केल्यामुळे या फेरीसाठी विदयार्थ्यांना खुप कमी वेळ मिळाला व रात्री १२.०० वाजता लिंक बंद केल्यामुळे वेळेअभावी विद्यार्थ्यांना प्रवेश मिळाला नाही व काही संस्थांना विद्यार्थ्यांची कागदपत्रे अपलोड करता आली नाहीत, अशा विद्यार्थ्यांकडून अंतिम दिनांक वाढवुन मिळावा व लिंक ओपन करुन मिळावी या करीता राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाकडे निवेदने देण्यात आलेली आहेत.

त्या अनुषंगाने दिनांक १३ व १४ ऑगस्ट २०१९ रोजी स्पॉट राऊंट फेरीमध्ये प्रवेश नियमातील तरतुदीनुसार **विलंब झालेल्या प्रवेशाची** तसेच **ज्या विदयार्थ्यांना प्रवेश मिळाला नाही** अशा विद्यार्थ्यांना प्रवेश मिळाला नाही याबाबत या कार्यालयास खालील मुद्दयाच्या अनुषगाने अहवाल त्वरीत सादर करावा .

१. आपल्या संस्थेत दिनांक १४/०८/२०१९ रोजी रात्री १२ वाजेनंतर प्रवेश प्रक्रिया चालु होती काय? असे असल्यास
२. प्रवेश घेण्यासाठी किती प्रवेशोच्छुक विद्यार्थी उपस्थित होते. ?
३. किती विद्यार्थी प्रवेशापासुन वंचित राहिले. ?
४. सदर विद्यार्थ्यांना प्रवेशाचा अंतिम दिनांक ३१/०८/२०१९ पर्यंत वाढल्यानंतर त्यांना नियमानुसार प्रवेश देण्यात आला काय ?
५. आपल्या संस्थेची प्रवेश प्रक्रिया दिनांक ३१/०८/२०१९ अखेर पुर्ण करण्यात आली आहे काय ?

सदर माहिती प्रवेश नियामक प्राधिकरणास सादर करायची असल्याने अहवाल तात्काळ दिनांक १७/०९/२०१९ रोजी सायंकाळी ०५:०० वाजेपर्यंत सादर करावा अन्यथा सदर माहिती निरंक समजण्यात येईल याची नोंद घ्यावी

(डॉ.दि.रा.नंदनवार)
प्र. सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,पुणे

तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,
३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४००००१
दूरध्वनी - २६२०६०१, २६९०६०२ २६४११५०/५१, फॅक्स - २६९२१०२.
E-mail :desk2a@dtemaharashtra.gov.in Internet :http://www.dtemaharashtra.gov.in

क्र.२अ/एडीएम/२०१९/ ८९३
दिनांक : 07 SEP 2019

प्रति.
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई, पुणे, नाशिक, औरंगाबाद, अमरावती, नागपूर

विषय : शैक्षणिक वर्ष २०१९-२० मधील राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षातील तंत्रशिक्षण विभागातंर्गत असलेल्या पदवी अभ्यासक्रमांच्या संस्थास्तरावरील प्रवेश प्रकियेबाबत..

संदर्भ : मा.आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांचे पत्र क्रमांक तंशिप्र/१२१९/प्र.क्र.२४७/सीईटी/२०१९/२४२६, दि.४/९/२०१९

उपरोक्त विषयासंदर्भीय पत्राची प्रत आपल्या माहिती व पुढील कार्यवाहीसाठी सोबत जोडून पाठविण्यात येत आहे. कृपया पहावे.

सदर पत्रात नमूद करण्यात आल्यानुसार पदवी अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रकियेच्या अंतिम दिनांक १४/८/२०१९ पर्यंत होता. त्यानुसार सर्व शासकीय, शासन अनुदानीत, विनाअनुदानीत खाजगी संस्थानी दिनांक १३ व १४ ऑगस्ट २०१९ रोजी संस्थास्तरवरील प्रवेश प्रकिया आयोजित केल्यामुळे या फेरीसाठी विदयार्थ्यांना खुप कमी वेळ मिळाला व रात्री १२.०० वाजता लिंक बंद केल्यामुळे वेळेअभावी विद्यार्थ्यांना प्रवेश मिळाला नाही व काही संस्थांना विद्यार्थ्यांची कागदपत्रे अपलोड करता आली नाहीत. त्यानुसार ज्या विदयार्थ्यांना संस्थास्तरावरील स्पॉट राऊंड मध्ये प्रवेश मिळाला नाही अश्या विदयार्थ्यांकडुन प्रवेश प्रकियेचा अंतिम दिनांक वाढवुन मिळावा व ज्या संस्थानां विदयार्थ्याची कागदपत्रे विहित वेळेत अपलोड करता आली नाही अश्या संस्थेकडुन प्रवेश प्रकियेचा अंतिम दिनांक व लिंक ओपन करुन देण्याबाबतची निवेदने राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाकडे प्राप्त झालेली आहेत.

१.त्याअनुषंगाने दिनांक १३ व १४ ऑगस्ट २०१९ रोजी स्पॉट राऊंड फेरीमध्ये प्रवेश नियमातील तरतुदीनुसार विलंब झालेल्या प्रवेशाची तसेच ज्या विदयार्थ्यांना प्रवेश मिळाला नाही अश्या विद्यार्थ्यांना प्रवेश मिळाला की नाही याची तपासणी/छाननी करुन त्याचा अहवाल राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाकडे सादर करण्याबाबत या कार्यालयास सूचित करण्यात आलेले आहे.

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय
पुणे.
आवक क्र. 8587

२.तसेच सदर प्रवेश प्रक्रिया मा.सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार दिनांक ३१/८/२०१९ अखेर पुर्ण झाली अथवा कसे याबाबतही सहसंचालकांचा अहवाल घेऊन प्रवेश नियामक प्राधिकरणास अवगत करावे असे कळविण्यात आले आहे.

वरील १ व २ च्या अनुषंगाने आपल्या विभागातील संबंधित संस्थेकडुन प्रवेशाबाबत आढावा घेऊन एकत्रित अहवाल या संचालनालयास दि.१५/९/२०१९ पर्यन्त सादर करावा जेणेकरुन सदर अहवाल प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई यांना सादर करणे सुलभ होईल.

(डॉ.अभय वाघ)
संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई

प्रत : मा.आयुक्त, राज्य समाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांना संदर्भाधिन पत्राच्या अनुषंगाने माहितीस्तव सादर.

महाराष्ट्र शासन

# राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष

[illegible] दिनांक : 4 SEP 2019

प्रति,

संचालक,

तंत्रशिक्षण संचालनालय,

महाराष्ट्र राज्य, मुंबई

विषय : शैक्षणिक वर्ष २०१९-२० मधील राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षातील तंत्रशिक्षण विभागांतर्गत असलेल्या पदवी अभ्यासक्रमांच्या संस्थास्तरावरील प्रवेश प्रक्रियेबाबत....

संदर्भ :
१ प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या दिनांक २० जुन, २०१९ रोजीच्या बैठकीचे इतिवृत्त
२ या कार्यालयास ईमेलद्वारे विद्यार्थ्यांकडून प्राप्त झालेल्या तक्रारी...
३ या कार्यालयास प्राप्त झालेली विविध संस्थांची निवेदने....
४ या कार्यालयाची No. TED १२१९/C.R. १९५/Extension-UG Admission Notice/२०१९/२३५५ दिनांक २६/०८/२०१९ रोजीची पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेश प्रक्रियेच्या वाढीव दिनांकाबाबत संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली सुचना...

उपरोक्त विषयानुसार आपणास कळविण्यात येते की, २०१९-२० करीता राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षातील तंत्रशिक्षण विभागांतर्गत विविध अभ्यासक्रमाच्या प्रवेश प्रक्रिया राबविण्यासाठी संदर्भ क्र. १ नुसार प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या दिनांक २० जुन, २०१९ रोजीच्या बैठकीतील निर्णयानुसार समिती गठित करण्यात आलेली होती.

तसेच पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेश प्रक्रियेचा अंतिम दिनांक १४ ऑगस्ट, २०१९ पर्यंत होता. त्यानुसार सर्व शासकीय, शासन अनुदानित, विनाअनुदानित खाजगी संस्थांनी दिनांक १३ व १४ ऑगस्ट, २०१९ रोजी संस्थास्तरावरील प्रवेश प्रक्रिया आयोजित केल्यामुळे या फेरीसाठी विद्यार्थ्यांना खुप कमी वेळ मिळाला व रात्री १२.०० वाजता लिंक बंद केल्यामुळे वेळेअभावी विद्यार्थ्यांना प्रवेश मिळाला नाही व काही संस्थाना विद्यार्थ्यांची कागदपत्रे अपलोड करता आलेली नाही.

Scanned by CamScanner

त्यानुसार ज्या विद्यार्थ्यांना संस्थास्तरावरील स्पॉट राऊंड मध्ये प्रवेश मिळाला नाही अशा विद्यार्थ्यांकडून प्रवेश प्रक्रियेचा अंतिम दिनांक वाढवून मिळणे व ज्या संस्थांना विद्यार्थ्यांचे कागदपत्रे विहीत वेळेत अपलोड करता आलेले नाही अशा संस्थेकडून प्रवेश प्रक्रियेचा अंतिम दिनांक व लिंक ओपन करुन देण्याबाबतची निवेदने या कार्यालयास प्राप्त झालेली आहे.

त्याअनुषंगाने आपण दिनांक १३ व १४ ऑगस्ट, २०१९ रोजी स्पॉट राऊंड फेरीमध्ये प्रवेश नियमातील तरतुदीनुसार विलंब झालेल्या प्रवेशांची तसेच ज्या विद्यार्थ्यांना प्रवेश मिळाला नाही अशा विद्यार्थ्यांना प्रवेश मिळाला की नाही याची तपासणी/छाननी करुन त्याचा अहवाल या कार्यालयाकडे तात्काळ सादर करावा. सदर प्रवेश प्रक्रिया मा. सर्वोच्च न्यायालयाकडील आदेशानुसार दि. ३१/०८/२०१९ अखेर पुर्ण झाली अथवा कसे याबाबतही सह-संचालकांचा अहवाल घेऊन प्रवेश नियामक प्राधिकरणास अवगत करावे.

(श्री. आनंद रायते)भा.प्र.से.
आयुक्त,
राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष,
महाराष्ट्र राज्य, मुंबई

Scanned by CamScanner